| MHPU120002882020 | **नियमित दिवाणी दावा क्र.४६/२०२० मधील निशाणी क्रमांक १३३ वरील आदेश** <br> **( सुभद्राबाई उर्फ शकुंतला शिवाजी तरस व इतर विरुध्द अमर किरण भालघरे व इतर )** |
|---|---|

प्रतिवादी क्र.१४ व १५ यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला " एकतर्फा ” आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. **(यापुढे त्यांचा उल्लेख संक्षिप्तरीत्या प्रतिवादी असा करणेत येईल.)**

**०२.** प्रतिवादी यांचा अर्ज व त्यावरील वादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

**०३.** प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१४ यांना दाव्याचे समन्स पुर्वीच लागलेले होते व प्रतिवादी क्र.१५ यांना समन्स नुकतेच लागलेले आहे. तसेच प्रतिवादी क्र.१४ यांची तब्येत ठीक नसते व त्यांना उच्च रक्तदाबाचा त्रास असून इतर व्याधी असल्याने ते घराबाहेर पडत नाहीत. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.१५ यांच्या घरी कर्ती व्यक्ती नसल्याने कौटुंबिक जबाबदारीतून हजर राहते आले नाही. त्यानंतर प्रतिवादी विरुध्द एकतर्फा आदेश झाला आहे. प्रतिवादी यांचा दावा मिळकतीमध्ये अविभक्त वडीलोपार्जित हिस्सा आहे. जर या प्रकरणामध्ये त्यांची बाजू मांडण्याचा हक्क नाकारला तर त्यांचे अतोनात नुकसान होणार आहे. सबब, त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०४.** वादी यांनी अर्जाच्या खाली म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध नसल्याचे कथन केले आहे.

**०५.** अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता, दिनांक १९/०४/२०२४ रोजी प्रतिवादी क्र. १५ यांच्या विरोधात एकतर्फा आदेश पारीत करणेत आलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र.१४ यांच्याविरोधात आदेश दिसून येत नाही. परंतु प्रतिवादी यांना त्यांना समन्स लागल्याचे व ते हजर न झाल्याचे मान्य केलेले आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीविरुध्द वाटप, ठराव व निरंतर ताकीद मिळणेकरीता दाखल केलेला आहे. दिवाणी

प्रक्रिया संहिता आदेश ९ नियम ७ अन्वये प्रतिवादीनी मागील अनुपस्थीतीबददल पुरेसे कारण दर्शविल्यास एकतर्फा आदेश रद्द करण्याची तरतूद आहे. सदर तरतूदीच्या अनुषंगाने प्रतिवादीने अर्जात नमूद केलेले कारण विचारात घेता प्रतिवादीस झालेला विलंब हा जाणूबनबुजून असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही. तसेच दाव्याचे स्वरुप पाहता प्रकरण गुणवदोषावर निकाली करणेकरीता प्रतिवादीस त्याच्या बचावाची संधी देणे योग्य व आवश्यक आहे. सदरची संधी दिल्यास वादी यांना कोणतीही तोषीस लागणार नाही. याउलट प्रकरण गुणदोषावर निकाली होणेस मदत होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**- आ दे श -**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १५ यांचेविरुध्द दिनांक १९/०४/२०२४ रोजी पारीत करणेत आलेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येत आहे.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2025.09.20 17:42:05 +0530

ठिकाण – भोर     ( एस.डी.शिरसाट )

दिनांक - २०.०९.२०२५     २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर. भोर.